आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१० जून २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पदभार स्वीकारला. /प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा १७ वा हप्ता जारी करत, शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकार वचनबद्ध असल्याची दिली ग्वाही
- नव्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तीन कोटी अतिरिक्त घरं बांधण्याचा निर्णय
- मराठा समाजाला लौकर आरक्षण दिलं नाही, तर विधानसभा निवडणुकीचे निकाल अनपेक्षित लागतील असा मनोज जरांगे यांचा इशारा
- अनेक हिंसक कारवायांमध्ये सहभागी असलेल्या नक्षलवाद्याचं पोलिसांपुढं आत्मसमर्पण

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं ७७ हजाराचा टप्पा ओलांडला, मात्र दिवसअखेर २०३ अंकांची घसरण

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज कार्यभार स्वीकारला. हा पदभार तिसऱ्यांदा स्वीकारल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा १७ वा हप्ता जारी केला. या २० हजार कोटी रुपयांच्या निधीचा फायदा ९ कोटी ३० लाख शेतकऱ्यांना होणार आहे. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी हे नवं सरकार वचनबद्ध आहे, अशी ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तीन कोटी अतिरिक्त घरं बांधण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नवी दिल्ली इथल्या

निवासस्थानी आयोजित, नव्या मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत बांधलेल्या घरांमध्ये शौचालयं, एलपीजी गॅस, वीज, पाणी यासारख्या सर्व पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एनडीए-राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा अभिन्न भाग असल्याचा निर्वाळा, पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २५ वा वर्धापन दिन आज साजरा होत आहे. मुंबईत षण्मुखानंद सभागृहात झालेल्या मेळाव्यात बोलतांना अजित पवार यांनी केंद्रीय मंत्रीपदावरून काहीही नाराजी नसल्याचं स्पष्ट केलं. स्वतंत्र प्रभाराच्या राज्यमंत्रिपदाचा प्रस्ताव एनडीएकडून मिळाला होता, मात्र आपण सध्या तो नाकारत, एनडीएसोबतच काम करत राहणार असल्याचं पवार यांनी सांगितलं. पक्षस्थापनेसह पक्षविस्तारासाठी योगदान दिलेल्या सर्वांप्रती अजित पवार यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

दरम्यान, आज सकाळी मुंबईत अजित पवार यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आलं. यावेळी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, मंत्री हसन मुश्रीफ, अनिल पाटील, रुपाली चाकणकर यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस भवनात राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या उपस्थितीत वर्धापन दिनाचा कार्यक्रम पार पडला. राष्ट्रपुरुषांच्या स्वाभिमानी विचारांवर आपण मार्गक्रमण करतांना, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी सांगितलेल्या ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या सूत्रानुसार आपण काम करत असल्याचं, पवार यांनी सांगितलं. जनतेची सेवा,

कष्टकरी, शेतकरी आणि महिला यांचा सन्मान तसंच महाराष्ट्राचा स्वाभिमान जपण्यासाठी आपण सर्वजण काम करण्यासाठी कटिबद्ध असल्याची भावना शरद पवार यांनी यावेळी व्यक्त केली.

अहमदनगर इथंही आज शरद पवार यांच्या उपस्थितीत मेळावा होत आहे.

**<><><><><>**

मराठा समाजाला लौकर आरक्षण दिलं नाही, तर आगामी विधानसभा निवडणुकीचे निकाल अनपेक्षित लागतील असा इशारा मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी दिला आहे. जालना जिल्ह्यात आंतरवाली सराटी इथं उपोषणाला बसलेले जरांगे आज वार्ताहरांशी बोलत होते. मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना विरोध करु, तसंच विधानसभा निवडणुकीत सर्व जातीधर्माचे २८८ उमेदवार उभे करु, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

शेतकऱ्यांना आवश्यक प्रमाणात बियाणं, खतांचा पुरवठा करण्याचे, तसंच प्रत्येक पात्र शेतकऱ्याला पीक कर्ज मिळेल याची दक्षता घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सर्व विभागीय आयुक्तांना दिले आहेत. त्यांनी आज मंत्रालयात त्यांच्या दालनात दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठक घेतली. राज्यातलं पाऊसमान, खतं, बी-बियाणं पुरवठा, पीक कर्ज वितरण, टँकरची स्थिती, धरणांमधला पाणीसाठा आणि विसर्गाचं नियोजन, पूर नियंत्रण, चारा उपलब्धता यांचा आढावा त्यांनी या बैठकीत घेतला.

पावसाच्या आगमनानंतर शेतकरी खरीप पिकांच्या पेरणीच्या तयारीला लागला आहे. त्यामुळे खते-बियाण्यांच्या अभावी कुठेही पेरण्यांना विलंब होता कामा नये, असं त्यांनी सांगितलं. आषाढी वारीसाठी मंजूर निधी ताबडतोब वितरित करण्याचे निर्देशही अजित पवार यांनी यावेळी दिले.

**<><><><>**

अनेक हिंसक कारवायांमध्ये सहभागी असलेल्या एका नक्षलवाद्यानं पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं असल्याचं आमच्या गडचिरोलीच्या वार्ताहरानं कळवलं आहे. किशोर उर्फ मुकेश पेंटा कन्नाके असं या नक्षलवाद्याचं नाव असून, तो भामरागड तालुक्यातल्या नेलगुंडा इथला रहिवासी आहे. राज्य शासनानं त्याच्यावर २ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलं होतं. ३ चकमकी, ४ खून, आणि जाळपोळीच्या ४ घटनांमध्ये त्याचा सहभाग होता, असं पोलिसांनी सांगितलं.

किशोर २०१४ मध्ये भामरागड दलममध्ये जनमिलिशिया सदस्य म्हणून सहभागी झाला. २०१५ मध्ये दंडकारण्य किसान मजदूर संघटनेचा अध्यक्ष, आणि नंतर २०१८ मध्ये नक्षलवाद्यांच्या क्रांतिकारी जनता समितीचा सदस्य म्हणून २०२२ पर्यंत तो कार्यरत होता.

**<><><><>**

देशातल्या शेअर बाजारांनी आज विक्रमी उंची गाठल्यानंतर दिवसअखेर घसरण नोंदवली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज कालच्या पेक्षा वर उघडला. तेजी वाढत गेल्यानं दिवसभरात त्यानं एकदा ७७ हजार ७९ अंकांची विक्रमी उंची गाठली. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी २३ हजार ४१२ अंकांच्या नव्या उंचीवर पोचला होता. मात्र नंतर नफा कमावण्यासाठी गुंतवणुकदारांनी विक्रीचा सपाटा लावल्यानं ही तेजी ओसरली. दिवसअखेर सेन्सेक्समधे २०३ अंकांची घसरण झाली आणि तो ७६ हजार ४९० अंकांवर बंद झाला. निफ्टीही ३१ अंकांची घसरण नोंदवत २३ हजार २५९ अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

मुंबई किनारी रस्ता प्रकल्पातल्या मरीन ड्राइव्ह ते हाजी अली या सव्वा किलोमीटर लांबीच्या बोगद्याची पाहणी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री

देवेंद्र फडनवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. त्यानंतर हा मार्ग वाहतुकीसाठी खुला झाला.

**<><><><>**

नीट परीक्षेतल्या कथित घोटाळा प्रकरणी सर्वंकष चौकशी करावी, तसंच निकालाचं फेरमूल्यांकन करावे, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

या परीक्षेत गैरप्रकार झाल्यानं लाखो विद्यार्थ्यांवर अन्याय झाला असून, सरकारी आणि खासगी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळणं कठीण झालं आहे. भाजपा सरकारनं विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळू नये, असे गैरप्रकार करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करावी, असं पटोले यांनी आज प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><>**

संत ज्ञानेश्वर माउली आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहोळ्यात सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांच्या सोयीसाठी आरोग्य विभाग २५८ आपला दवाखान्याची सुविधा उपलब्ध करुन देणार आहे. पालखी मार्गावर प्रत्येक ५ किलोमीटर अंतरावर हा दवाखाना सुरु असेल. पालखी मार्गावर ३२ ठिकाणी अतिदक्षता विभागातील सोयी सुविधा असणाऱ्या ८७ खाटा सज्ज असतील. तसंच ७०७ रुग्णवाहिका चोवीस तास वारकऱ्यांच्या मदतीसाठी असतील. महिलांसाठी प्राथमिक उपचारांची ४ हजार ५०० पाकिटं प्रत्येक दिंडी प्रमुखांकडे सोपवली जाणार आहेत.

**<><><><>**

श्रीराम जन्मभूमी मंदिराच्या दर्शनासाठी जाणाऱ्या राज्यातल्या भाविकांच्या सोयीसाठी अयोध्येत बांधलं जाणारं महाराष्ट्र सदन  येत्या २ वर्षात पूर्ण होणार

असून त्यासाठी उत्तर प्रदेश सरकारनं सुमारे अडीच एकराचा भूखंड मंजूर केला आहे, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांनी दिली. चव्हाण यांनी या प्रस्तावित जागेची पाहणी केली त्यावेळी ते बोलत होते.

भूखंड अधिग्रहित करण्यासाठी विभागानं सुमारे ६७ कोटी रुपयांची तरतूद केली असून या जागेच्या व्यवहाराचा पहिला टप्पा म्हणून उत्तर प्रदेश सरकारला १० टक्के रक्कम अदा केली आहे. ही इमारत बांधण्यासाठी २६० कोटी रुपयांचं अंदाजपत्रक तयार केलं आहे, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

नैर्ऋत्य मौसमी पाऊस आज उत्तर अऱबी समुद्राच्या आणि राज्याच्या आणखी काही भागांत दाखल झाला. पुढच्या दोन दिवसांत उत्तर अरबी समुद्र आणि राज्याच्या आणखी काही भागांत नैर्ऋत्य मौसमी पाऊस दाखल होण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचं हवामान विभागानं सांगितलं आहे.

उद्या कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी, तर विदर्भात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. कोकण किनारपट्टी आणि विदर्भात काही ठिकाणी सोसाट्याचा वारा वाहण्याचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**